Jagdamba Education Society's

# Santosh N. Darade Polytechnic

At.Babhulgaon, Tal.Yeola, Dist.Nashik- 423 401

Accredited by NBA NATIONAL BOARD OF ACCREDITATION

## * Central Library *

Please Consider the Environment Before Printing…

**Date: 07/08/2025**

## Activity Name: Day Special

## दिन विशेष

**News Paper Name: आपलं महानगर**

**Page No. 04**


आपल्या वाचन्या, आतल्या वाचन्या...

आपलं महानगर My महानगर.com www.mymahanagar.com


# दिनविशेष

## हरितक्रांतीचे जनक एम.एस.स्वामिनाथन



डॉ. एम.एस. स्वामिनाथन हे भारतातील कृषी शास्त्रज्ञ होते. भारतात हरितक्रांती घडवून आणण्यात त्यांचा महत्त्वाचा वाटा होता. त्यांनी कृषि क्षेत्रातील संशोधनासाठी 'एम.एस. स्वामिनाथन रिसर्च फाऊंडेशन'ची स्थापना केलेली आहे. भारतीय गरीब शेतकऱ्यांच्या शेतात गव्हाचे व तांदळाचे उच्च उत्पन्न देणारे वाण पेरून हरितक्रांती घडवून आणण्याचे श्रेय स्वामीनाथन यांना जाते. त्यांच्या प्रयत्नांमुळेच गहू व तांदूळ यांच्या उत्पादनात भारत स्वयंपूर्ण होऊ शकला. भारत सरकारने डॉ. मोणकोंबू सांबशिवन स्वामीनाथन यांच्या अध्यक्षतेखाली स्वामीनाथन आयोगाची स्थापन केला. मोणकोंबू सांबशिवन स्वामीनाथन यांचा जन्म तमिळमाडूमध्ये कुंभकोणम येथे ७ ऑगस्ट १९२५ रोजी झाला. त्यांचे वडील डॉक्टर होते. वडिलांप्रमाणे तेही डॉक्टरी शिक्षणाकडे वळले. पण १९४३ मधील बंगालच्या दुष्काळामुळे त्यांनी ते शिक्षण अर्धवट सोडून दिले आणि ते शेतकी विषयाचे शिक्षण घेऊ लागले.

स्वामीनाथन यांचा विवाह मीना स्वामीनाथन यांच्याशी झाला होता. गांधी आणि रमण महर्षी यांचा स्वामिनाथन यांच्या जीवनावर प्रभाव होता. त्यांच्या कुटुंबाच्या मालकीच्या २,००० एकर जमिनीपैकी एक तृतीयांश त्यांनी विनोबा भावे यांच्या भूदान चळवळीत दान केली.स्वामिनाथन त्यांनी स्वामी विवेकानंद यांच्या विचारांचे अनुसरण केले. त्यांना भारतरत्न,पद्मश्री, पद्मभूषण, पद्मविभूषण आदी पद्म पुरस्कार, तसेच रॅमन मॅगसेसे पुरस्कार, शांति स्वरूप भटनागर पुरस्कार, जागतिक अन्न पुरस्कार १९८७ हा कृषी क्षेत्रातील पहिला सर्वोच्च सन्मान, अल्बर्ट आईन्स्टाईन जागतिक विज्ञान पुरस्काराने सन्मानित करण्यात आले होते. स्वामीनाथन यांचे चेन्नई येथील त्यांच्या घरी २८ सप्टेंबर २०२३ रोजी वयाच्या ९८ व्या वर्षी निधन झाले.


Nashik Edition

Aug 07, 2025 Page No. 4

Powered by: erelego.com



S.N.D. POLYTECHNIC, BABHULGAON CENTRAL LIBRARY YEOLA DIST. NASHIK


LIBRARIAN
MR.U.D. MULANI
SND POLYTECHNIC
YEOLA-423401

PRINCIPAL
PROF.U.B JADHAV
SND POLYTECHNIC
YEOLA-423401